# वर्षभराचे लक्ष्य ४२ टक्के

## 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ'चे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे मेट्रोसमोर आव्हान

म. टा. खास प्रतिनिधी

मुंबई : दक्षिण व उत्तर मुंबईला जोडणाऱ्या मेट्रो ३ प्रकल्पासमोर पहिल्या टप्प्यासाठी जवळपास वर्षभरात ४२ टक्के काम पूर्ण करण्याचे आव्हान आहे. हा टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करायचा असताना रूळ व प्रणालीचे काम सरासरी ५८ टक्केच पूर्ण झाले आहे.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' ही मेट्रो-३ मार्गिका उभी केली जात आहे. या मार्गिकेतील पहिला टप्पा आरे (सारिपूतनगर) ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय) असा सुरू होणार आहे. मात्र त्यासंबंधीची काही अद्यापही निम्म्याजवळ आहेत.

- पहिला टप्पा सरासरी ८२ टक्के पूर्ण
- रूळ, प्रणालीचे काम ४२ टक्के बाकी

मेट्रो-३ला विकसित करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनुसार, प्रकल्पाच्या पाच भागांचा विचार केल्यास, रूळासंबंधीची पहिल्या टप्प्यातील कामे ५९.८० टक्के पूर्ण झाली आहेत. तर एकंदर प्रणालीशी संबंधित कामे ५५.१० टक्केच पूर्ण झाली आहेत. तर नियंत्रण प्रणालीशी निगडित कामे ५४.७० टक्के पूर्ण झाली आहेत.

हा टप्पा डिसेंबरमध्ये सुरू करायचा असताना या तीन विभागांतील कामे निम्म्याहून अधिक बाकी असल्याने ते पूर्ण करण्याचे एक मोठे आव्हान कंपनीसमोर असेल. सुदैवाने स्थानकांची उभारणी ९०.४० टक्के व भुयारे १०० टक्के पूर्ण होऊन भूयारीकरणाचे काम ९६.८० टक्के पूर्ण आहे. या सर्वांचा एकत्रित विचार केल्यास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील सरासरी ८२ टक्के कामे सध्या पूर्ण झाली आहेत.



### दुसरा टप्पा २०२४पर्यंत

प्रकल्पाचा दुसरा टप्पा डिसेंबर २०२४पर्यंत सुरू होणार आहे. दुसऱ्या टप्प्याची सरासरी कामे सध्या ७२ टक्के पूर्ण आहेत. पण रूळ आणि नियंत्रण प्रणालीची कामे निम्मी बाकी आहेतच. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील कामांचा एकत्रित विचार केल्यास, हा प्रकल्प सध्या ७७.६० टक्के पूर्ण आहे. परंतु यांतील सर्वात महत्त्वाचे आणि बहुचर्चित आरे कारशेड ३७.८० टक्केच पूर्ण आहे.